वर्ष पाचवे, अंक पहिला, ०८ मे २०१० ( खाजगी वितरणासाठी )

# मैत्री इंद्रधनू

'मैत्री'चे वार्तापत्र

**''मैत्री''च्या इंद्रधनू ने फार वाट पहायला लावली, असा आरडाओरडा झाल्यावर नेहमीच्याच कामांमधून सवड काढून स्वयंसेवक कामाला लागले. त्यामुळे या अंकात बऱ्याच ताज्या घटना घेऊन इंद्रधनुची उणीव भरुन काढण्याचा प्रयत्न या गटाने केला आहे.**

**गेली दोन वर्ष इंद्रधनुचा अंक तयार केला नाही, याची गटाला खंत आहेच.**

## मेळघाटचे प्रकाशदूत

**जयश्री शिदोरे**

मेळघाटमध्ये १९९७ च्या पावसाळ्यात २५० स्वयंसेवकांनी प्रत्येकी एक आठवडा राहून काम केले. त्यामुळे ४ महिन्यात ७ दुर्गम गावात एकही बालमृत्यू झाला नाही. १९९८ पासून तिथे कायम वास्तव्य करण्यासाठी रामेश्वर फड, परभणी जिल्ह्यातून मेळघाटात आला.हा राज्यशास्त्र विषयातील पदवीधर. लहानशा झोपडीत, दाट जंगलात वीज नाही, रस्ता नाही, फोन नाही अशा ठिकाणी राहून काम करण्याची तयारी. पहिली दोन वर्ष सतत लोकांच्या संपर्कात राहण्याचे काम होते. गावातील कोरकू आदिवासींशी ''मैत्री'' करणे, त्यांच्या छोट्या छोट्या अडचणींवर उपाय शोधणे, त्यांच्या रोजच्या जगण्यात येणाऱ्या प्रश्नांबद्दल बोलणे आणि त्यांना समजून घेणे हे त्याचे काम असायचे.



**रामेश्वर फड** त्यांच्यात मिसळता यावं म्हणून, रात्री गावात चालणाऱ्या भजनात सामील व्हायचा. शेतांवर चालत जाताना लोकांशी गप्पा मारायचा. गावातली मयत असो किंवा एखादं लग्न.... त्याची हजेरी निश्चित. यामुळे लोकांना तो सरकारी नोकर नाही – आपल्या मदतीसाठीच आला आहे, हा विश्वास वाटायला लागला. त्यामुळे त्यानंतर काही कामे ठोस अशी दाखवता येतील व ती होण्यासाठीचा एक पायाच निर्माण झाला.

रामने शिक्षण सोडलेले गावातले युवक, अर्धवेळासाठी गावातल्याच मुलांना शिकवण्यासाठी शोधण्याचे काम सुरु केले.

**मधुकर माने** हा सातारा जिल्ह्यातील मानेवाडीचा. रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयात एम. एस. डब्ल्यू. झालेला. संशोधनात रस असलेला आहे. जन्म दाखले जोडून प्रवेशाचे फॉर्म भरायला मदत करणे, प्रवेशासाठी लागेल ती मदत करणे, मुलांनी प्रवेश घ्यावा म्हणून त्यांच्या पालकांना समजावणे असे काम तेव्हा केल्याने एकेका वर्षी १५५ ते २०० विद्यार्थी आश्रम शाळेत शिकण्यासाठी गेले. आता जून महिन्यातून प्रत्येक गावातून ५ वर्ष वयाची मुले शिकण्यासाठी आश्रमशाळेत जाणार ही पध्दत रुढ झाली आहे. कारण गावात असलेल्या शाळेवर – शिक्षकांवर विश्वास राहिलेला नाही.

मेळघाटामधले काम कुपोषण कमी करणे आणि बालमृत्यू रोखणे यासाठी सुरु केलेले. गावागावात लोकांशी संपर्क वाढत जाऊन २००२ पर्यंत २० गावात 'मेळघाट मित्र' पोहोचले. स्वयंसेवक पुण्याहून कोणत्या न कोणत्या कामासाठी राम–चंदू–मधू यांच्या मदतीसाठी, अभ्यासवर्ग पाहण्यासाठी सतत जात राहिले. त्यामुळे आरोग्याच्या कामाला गती येत गेली. बालमृत्यूची समस्या नेमकेपणाने मांडण्यासाठी २००० पासून काम सुरु झाले होते. प्रत्येक गावातून अर्धवेळ काम करणारी एक आरोग्य मैत्रीण अशा १२ गावांसाठी महिला तयार झाल्या. त्यांना कामासाठी घरातून बाहेर पडणे, लोकांशी बोलणे, गावातल्या लहान मुलांचे आजार, दिवस राहिलेल्या बायका, बळंतीणीची काळजी असे अनेक विषयांचे प्रशिक्षण देत राहिल्याने त्या उत्तमोत्तम काम करतात. आहाराबद्दल बायकांना सांगतात. गंभीर आजार त्यांना ओळखता येतात. डॉक्टरांकडे जाण्यासाठी त्या मदत करतात. 'मधू' सर म्हणून त्यांना प्रत्येक केस मधूला सांगायची असते. त्यांना उत्तम प्रकारे जन्म–मृत्यू नोंदी नोंदविता येतात. बाळाचे वजन, उंची, डोक्याचा घेर, लसीकरण हे सर्वच विषय राम, मधू, चंदू यांच्य मदतीने त्यांनी पूर्ण केलेत. पुन्हा पुन्हा उजळणी करुन, परिक्षा घेऊन त्यांनी गावाच्या आरोग्य रक्षणाची जबाबदारी घेतली आहे. मधुने त्यांची तयारी करुन घेण्यासाठी भरपूर कष्ट, मेहनत घेतली आहे. प्रशिक्षणासाठी अभ्यास व वाचन केले आहे. १९९७ मध्ये १२६ असलेला बालमृत्यू दर आता ७५ पर्यंत खाली आला आहे. म्हणजे शहरी वस्त्यांमध्ये असलेला दर आता दूर्गम असलेल्या मेळघाटमधल्या १२ गावांत आहे.



१२ आरोग्य मैत्रिणींच्या मदतीने हे अवघड काम मधुला प्रत्यक्षात आणता आले. तरीही प्रत्येक वर्षी गावागावांतून आरेग्याचे सर्वेक्षण आणि नोंदी ठेवणे हे काम सुरुच आहे. आरोग्य शिक्षणामुळे त्याला खूप मदत होते. गावात सर्वांनाच ही जाण येत आहे. आता २८ गावात मेळगाट मित्रांचे काम सुरु आहे. १२ आरोग्य मैत्रिणींची मदत आहेच. मेळघाटातले पूर्ण काम करण्यासाठी तयार असणारे गेंदलाल आणि राजाराम हे दोघे कोरकू युवक राम, मधू, चंदू यांच्यासोबत गेली ६ वर्षे काम करित आहेत.

आरोग्य शिक्षण या बरोबरच शेती सुधार हेही काम कुपोषण दूर होण्यासाठी महत्त्वाचे आहे. म्हणजे हातात पैसा राहू शकेल. पोटभर अन्नही ते खाऊ शकतील एवढे उत्पन्न शेतातून मिळायला हवे. वाहून जाणारे पाणी अडण्यासाठी माती शेतातच रहावी यासाठी बांध घालणे, चर खणणे, अशी कामे लोकांना सोबत घेऊन करण्यासाठी लोकांसोबत बोलणे, बैठका सुरु करणे अशी कामे गेंदलाल, राजाराम यांच्या मदतीने राम–मधू–चंदू करतात.

मैत्री
मैत्री स्वतःशी, मैत्री सर्वांशी !

**चंद्रकांत जगदाळे** सांगलीकडचा पदवीधर आहे. तो २००३ पासून 'मेळघाट मित्र' म्हणून काम करतो. रोजगार हमीची कामं गावाला मिळावीत यासाठी धडपड करून त्याच्या मदतीने वनखात्याचं काम मिळालं. पण लोकांना मजुरी देण्यात दिरंगाई आणि दरही कमी का असे विचारण्याचे धाडस केल्यावर मजुरी दोन महिने मिळाली नाही. तेव्हा चंदूने प्रसिध्दी माध्यमांकडे जावे लागेल असे सांगताच रात्री १२ वाजता लोकांच्या मजुरीचे लाखाच्यावर पैसे त्यांना मिळाले. चिल्हाटी गावात 'मेळघाट मित्र' चे भक्कम घर उभे आहे. आसपासच्या अनेक गावांतून लोक हक्काने मदत हवी म्हणून तिथे येतात, अडचणी सांगतात.



राम सुरुवातीला तिथे राहायला गेला नसता तर सर्व कामं उभी राहिली नसती. सामाजिक कार्याचा अनुभव नसतानाही तो धाडसाने, भक्कमपणाने चिल्हाटीत राहून लोकांशी संबंध ठेवत राहिला. त्यामुळेच पुढे अनेक कामं सुरु झाली.

मेळघाटातला अंधार ज्ञानाच्या प्रकाशामुळे दूर व्हावा, असे हे काम. या कार्यकर्त्यांच्या सातत्यपूर्ण परिश्रमामुळे नक्कीच मेळघाटातला अंधार दूर होत चालला आहे. कोरकू लोकांचा नामशेष होण्याचे भाकित १९९७ साली अनेक मानववंश शास्त्री सांगत होते. ''मैत्री'' ने त्या मेळघाट मित्रांना वाचवण्यासाठी सर्वतोपरी मदत करत रहाण्याचे स्वप्न पाहिले आहे. सत्यात आणण्यासाठी आमचे हे तीन शिलेदार प्रकाशदूत झाले आहेत.




| Melghat | Maitri | Muktaa | Bamnoli |
|---|---|---|---|
| 37.5 | 13 | 43 | 6.5 |

मैत्रीकडे जमा होणाऱ्या प्रत्येक रुपयाचा हिशोब चोख रहावा याकडे सातत्याने श्रीयुत अतुल कुलकर्णी गेली दोन वर्ष लक्ष देत आहेत. प्रत्येक देणगी आणि संपूर्ण हिशोब याचा ताळमेळ केव्हाही कार्यालयात बघायला मिळतो.

''मैत्री'' ची वेबसाईट **www.maitripune.net** या नावाने आहे. आता ती नव्या रुपात पाहता येणार आहे. त्यातून काम करण्याची इच्छा असलेले मित्र ''मैत्री''शी जोडले जातील. त्यासाठी एक गट मेहनत घेतो आहे. बरेच फोटो, विश्वस्तांची ओळख, नवे प्रकल्प याबद्दल सविस्तर माहिती त्यामुळे सर्वांना मिळेल.

मैत्री स्वत:शी, मैत्री सर्वांशी !

## ''मैत्री'' ची तिजोरी – लीनता वैद्य




गेली ३ वर्ष ''मैत्री'' चे स्वयंसेवक अनेक गृहसंकुलामधून कामाविषयी सांगून दर महिन्याची रद्दी देण्याचे आवाहन करुन नियमितपणे रद्दी विक्रीतून ''मैत्री'' कडे निधी येत राहिला आहे. दरवर्षी एक लाख याप्रमाणे सुमारे साडेचार लाख रुपये फक्त रद्दी विक्रीतून जमा झाले आहेत.

त्यात प्रज्ञानगड, औदुंबर, शुक्रतारा, त्रिमूर्ती आणि दामोदर संकूल ही सिंहगड रस्त्यावरची गृहसंकूलं तर स्नेह पॅराडाईज, राहूल टॉवर्स आणि पिनाक सदिच्छा ही पौड रोडवरची, वुडलँड आणि मारुती मंदिर परिसर ही गृहसंकूलं दीड वर्षापासून सामील झाली आहेत. म्हणजे साधारण ८०० घरांपर्यंत ''मैत्री'' चे काम आपण पोहोचवू शकलेलो आहे. तरीही अणखी बऱ्याच व्यक्ती आपल्या उपक्रमात सामील होवू शकतात. आपण त्यांच्यापर्यंत नियमित पोहोचू शकलो नाही तरीही त्यांना आवाहन पोहोचवणे आवश्यक आहे. आपण त्यासाठी एक 'तिजोरी' ची कल्पना प्रत्यक्षात आणली आहे. त्यासाठी एक पध्दत ठरवली आहे.

- ही 'तिजोरी' आपण 'मैत्री' विषयी सांगून एक पानी माहिती पत्रक देऊन रु. १५०/– घेऊन पावती द्यायची आहे. त्यांनी नियमितपणे रद्दीविक्रीतून आलेली रक्कम तिजोरीत जमा करावी.
- त्यांना दर ३–४ महिन्यांनी तिजोरीचा वापर कसा चालू आहे, याबद्दल विचारणा करायची आहे.
- दर ६ महिन्यांनी स्वत: वेळ निश्चित करुन घरी जाऊन 'तिजोरी' मधील रक्कम ''मैत्री'' साठी घेऊन पावती द्यायची आहे.
- जमलेल्या निधीचा उपयोग कसा केला हे सांगणे आपले काम आहेच.
- त्यांच्या घरात अथवा कार्यालयात 'तिजोरी' पाहून कोणी विचारणा केल्यास त्यांच्यकडे 'तिजोरी' देणे आपल्याला सहज शक्य आहे.
- त्यासाठी नव्या 'तिजोरी' धारकांची सर्व माहिती आपल्याकडे जमा व्हावी यादृष्टीने एक फॉर्म बनवला आहे. तो ई–मेल अथवा प्रत्यक्षात दिल्यास ''मैत्री'' कडे सर्व माहिती आणि 'तिजोरी' चा हिशोब अद्ययावत राहिल.




त्रिमितीच्या 'बाराखडी दिलसे' या स्वंयसेवी गटाने मुंबईत एक जाहिर कार्यक्रम ठरवून आपल्या राम–मधू–चंदू आणि डॉ. वैभव आगवणे, डॉ प्रियदर्शन तुरे यांची मुलाखत घेतली. तिथेच 'तिजोरी' उपक्रमाची सुरुवात झाली.

याप्रमाणे नवनवीन व्यक्ती, कार्यालये, उद्योग यांना चांगल्या कामात सहभागी होण्यासाठी आपण संधी उपलब्ध करुन देऊ शकतो. सध्याप्रत्येक मंगळवार बैठकीत आपले स्वयंसेवक 'तिजोरी' घेण्यासाठी येत आहेत.

''मैत्री'' ची तिजोरी तुमच्या प्रतिसादाची वाट पाहत आहे.

## सुंदर मी होणार ! – अपर्णा रिसबूड



मला मंगळवारची बागेतली बैठक, अनेकांनी काढलेले फोटो, जाऊन आलेल्यांचे फोटो, त्यांचे अनुभव अशी मला मेळघाटाची ओळख झाली होती. पण स्वत: जाऊन येण्यासाठी कधी संधी मिळते याची मी वाट पाहत होते.

पुण्यात १५ वर्षे ब्युटिशियन म्हणून मी काम करत आहे. त्यामुळे मेळघाटामध्ये जाऊन काय बघायचं हा विचार डोक्यात घेऊन मी जानेवारीत गेले होते. निरीक्षणातून बऱ्याच गोष्टी दिसत होत्याच. पण तरीही तरुण मुलींशी गप्पा मारुन आणखीही खूप समजलं.

शहरातल्या सर्वसामान्य मुलींप्रमाणेच तिथल्या मुली देखील सौंदर्याबाबत जागरुक आहेत. हाथरु आश्रमशाळा असो अथवा रुईपठार, चिलाटी गावातल्या मुली असोत. सगळ्यांमध्येच स्वत: चे दिसणे, रहाणे याबाबत एक जागरुकता, उत्सुकता आहे. आपल्या मुलींप्रमाणे त्यांनाही भुवया कोरणे, लिपस्टिक लावणे, स्नो लावणे आवडते. एवढेच नाही तर काही जणी केस सुध्दा रंगवतात. हे बघून मी चकित झाले. अर्थात आपल्याकडे असलेली सौंदर्य साधनांची उपलब्धता तेथे नाही. पण उपलब्ध असलेल्या गोष्टींमधून त्या सर्व ते प्रयत्न करित होत्या. थ्रेडिंगसाठी दोरा नसेल, तर ब्लेडने सुध्दा भुवयांना आकार दिला होता. दोऱ्याचा उपयोग भुवयांना आकार देण्यासाठी करण्याची पध्दत त्यातल्या काही जणी शिकल्या आहेत. तर काही ब्लेड ही त्यासाठी वापरतात असं घाबरत सांगत होत्या.

चिलाटीमधील मुलींशी बोलताना जाणवलं, की स्नो, पावडर, लाली या गोष्टी जवळजवळ सर्व घरात पोहोचल्या आहेत. मात्र या गोष्टी वापरण्यासाठी आपल्याकडे जशी एक साधारणत: वयोमर्यादा आहे, ती तिकडे नाही. म्हणजे ७–८ वर्षांची मुलं–मुलीसुध्दा भुवया कोरतात. मुलं असं चुकून नाही म्हटलं, हो मुलंही भुवया कोरतात........... ते ही ब्लेडनी. डोळ्यासारख्या नाजूक भागाजवळ ब्लेड वापरणं धोक्याचं आहे याची त्यांना जाणीव नाही. ती नक्कीच करुन द्यायला हवी.

सौंदर्याबद्दलची जाणीव ही मूलभूत, उपजत आणि अगदी नैसर्गिक असते. त्याला वय, जात, आर्थिक स्तर, खेडं, शहर कशा कशाचही बंधन नसतं, हे किती सहजपणे दिसत होतं. पुराणकाळातल्या कित्येक स्त्रीयाही साज–शृंगार करत असत. त्याचे दाखले मिळतात. त्यांना आधुनिक प्रसाधन पध्दती माहित नव्हती पण त्या नैसर्गिक उपायांनी प्रसाधना करत. तशाच या मेळघाटातील वनकन्या सुदर दिसण्यासाठी प्रयत्न करित होत्या......... मला खूप बरं वाटलं.

त्यांच्याशी गप्पा मारता मारता स्वभाविकपणे त्या शिकलेल्या दोरा धरणं, बोटांना गुंडाळणं, हातांची हालाचाल अशा पध्दतीचे सगळे बारकावे मला समजले. पध्दत अगदी नेहमीचीच असली तरी ती अचूकपणे वापरुन भुवयांना कसा आकार देता येईल याचं एक प्रात्यक्षिकही दाखवलं. जाता जाता स्वच्छता आणि सौंदर्य दोन्हीही किती महत्त्वाचं असतं, हे सांगता आलं. या कोरकू मुलींना आहे त्या स्थितीत छान–आकर्षक दिसायचं आहे हे खूप आशादायी चित्रं मी पुण्याला येताना बरोबर घेऊन आले.

## Urban Students @ Bamnoli School

**Sandeep Bhadkamkar :**
**sandeep@automationteknix.com**
**Mobile : 9890033285**

It is all started with a visit by 4 students from various Pune school to Bamnoli English School, a school situated in Bamnoli, about 110 kms from Pune in Raigadh Dist., in May 09. The school covers 6 nearby villages with a population of 3,500+ with more than 90% students belong to BPL (below poverty line).

Finding that the roofs are missing from some of the classes & the school is not financially well off, the group decided to raise funds for the same. A group of 7 students from Sneh Paradise Federation visited 450 flats, door to door raise Rs. 25,000 in 18 days.

Meanwhile, the school teachers contributed towords these repairs and the idea nLiten emerged. We, then, thought of getting involved with the school in more than one way by deciding for focus on teaching about 400 students from standard 5$^{th}$ to 10$^{th}$, computers, English, Maths & Science by visiting the school every month. It would have served duel purpose of

- improving subject knowledge of rural students thro' teaching and science / computer practical.
- Giving an opportunity to Urban students understand hardships in their rural counterparts go thro'.

nLiten Team has been able to make following changes for Bamnoli students.

- Building 12 toilet blocks for students.
- Computer lab with 5 PCs started.



BEFORE

NOW



- Library with 200 books.
- Sports accessories for both boys & girls.
- Computer classes for 2 teachers that in turn will help impart better training to students.
- Offering Jobs & free higher post graduation / professional training to passed out students.
- Medical camps for students.
- Close interaction with school staff & villagers on some of the issues.
- A 5 member group of turned into a 25 devoted team nLiten in 1 academic year.

Bamnoli Activity is in need of your help
Budget for 2010-11 is approximately
Rs. 5,00,000/-

## ACM + MAITRI

MAITRI and Associated Colleges of the Midwest (ACM) are coming together for ACM's India Summer Programme. A gorup of 8 students will be visiting Pune for 6 weeks from June 19th to July 31st, 2010.

MAITRI is privileged to host these aspiring young students, by mentoring them, co-oridinating their activities and helping them make their visit a landmark success.

The schedule includes a visit to Melghat. Some or all may decide to commence their projects there and stay on for further 4 weeks. The rest will engage in projects in Pune itself.

For this duration, we will be providing suitable accommodation for their stay and interpreters during their visit to Melghat.

We appeal to everyone for actively participating in this endeavor by opening their hearts and homes to our new friends.

For further details please contact :
**Asmita Apte : 9822814229**

**संपर्कासाठी पत्ता :**
'मैत्री', 'कल्याण', ३२ नटराज सोसायटी, गल्ली क्र.९, कर्वेनगर,
पुणे - ४११०५२ फोन नं : ०२०- २५४५०८८२ / २५४४३१३४
E-mail : maitri1997@gmail.com
Website : www.maitripune.net

मैत्री 'इंद्रधनू' हे 'मैत्री'च्या सर्व उपक्रमांची माहिती देणारे व सर्व विभागातील घडामोडी एकत्रित स्वरूपात कळाव्यात यासाठीचे मुखपत्र आहे.

मैत्री स्वतःशी, मैत्री सर्वांशी !

हा अंक इंद्रधनु गट आणि राधिका कुलकर्णींच्या मदतीने
E-mail : indradhanu.pune@gmail.com
radhu1854@gmail.com



## एन्ड्युरो मेळघाटात

गेली दोन वर्ष एन्ड्युरो या साहसी क्रिडा स्पर्धेसाठी मेळघाटहून मोजके युवक पुण्यात स्पर्धक म्हणून अनुभव घेण्यासाठी येत आहेत. अशीच स्पर्धा मेळघाटातील युवकांसाठी घ्यावी असा विचार नॅशनल एज्युकेशन फाऊंडेशन चे श्री. प्रसाद पुरंदरे यांनी मेळघाटातील चिलाटी गावाला भेट दिल्यावर बोलून दाखवली. ''मैत्री'' च्या स्वयंसेवकांनी त्यासाठी भरपूर विचारविनिमय सुरु ठेवला आहे. अधिकाधिक युवकांची त्यासाठी मदत हवी आहे.

- दरवर्षीप्रमाणे पावसाळ्यातली 'धडक मोहिम' मेळघाटात होणार आहे. फक्त दहा दिवस लहानशा गावात, कोरकू आदिवासींसोबत, मदत करण्यासाठी जाऊन राहण्याची तयारी हवी. प्रवास खर्च आपापला करायचा असतो. सामील व्हायचे असल्यास दहा जून नंतर ''मैत्री'' कार्यालयाशी संपर्क साधावा. **दूरध्वनी : २५४५०८८२**
- त्रिमितीच्या बाराखडी दिल से या मुंबईच्या स्वयंसेवी गटाने ''मैत्री'' च्या मेळघाटातील कामावर एक माहितीपट तयार करण्यासाठी मेळघाटात आणि पुण्यातही कामाचे चित्रीकरण केले आहे.
- 'Raisers Ask' या बंगलोरहून निघणाऱ्या त्रैमासिकात ''मैत्री'' च्या उपक्रमांबद्दल विनिता ताटके यांचा लेख प्रसिध्द झाला आहे. सलग १२ वर्ष संध्याकाळी ६.३० वा. कमला नेहरु बागेतल्या मंगळवारच्या बैठकीबद्दल अर्थातच लिहिले आहे.

'मैत्री'कडे आयकर कायद्यानुसार ८० जी सवलत आहे. तसेच परदेशी मदत स्वीकारण्याची परवानगी आहे. आपण आपले धनादेश अथवा डिमांड ड्राफ्ट 'मैत्री' या नावाने काढू शकता. ऑनलाइन डोनेशनसाठी बँक ऑफ महाराष्टच्या कोणत्याही शाखेत (खाते क्र. ६०००८५५५२७६ ) मध्ये पैसे भरुन आम्हाला कळवावे. १५ दिवसांत पावती व कामाचा परिस्थिती अहवाल आपणांकडे पोहोचेल.
प्रामाणिकपणा, बांधिलकी व पारदर्शकतेची हमी आम्ही घेतो.

**<u>मुक्ता हेल्पलाईन</u>** सलग ५ वर्ष ५०,००० पेक्षा जास्त प्रश्न कर्त्यांना समाधानकारक उत्तर देऊन, शंका निरसन करत महाराष्टातच नव्हे तर परदेशातही पोहोचली आहे.
**दूरध्वनी : ०२० - २५४६०१०२**